# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

घोडबंदर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणेसाठी मा. विशेष महासभा दि.02/03/2019 ठराव क्र.136 अन्वये निर्णय झाला. घोडबंदर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणेसाठी मे.गारनेट इंटेरीयर प्रा.लि. या शिल्पकार संस्थेची महानगरपालिकेकडुन दि.04/08/2021 रोजीच्या कार्यादेशान्वये नेमणुक केली आहे. सदर कामाची मुदत हि दि.03/08/2023 रोजी पर्यंत होती. राष्ट्र पुरूष/ थोर व्यक्ती यांचे पुतळे उभारणेसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील दि.02 मे 2017 रोजीच्या शासन निर्णयानूसार मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वानूसार महानगरपालिकेमार्फत कला संचलनालय, महाराष्ट्र शासन यांची पुतळ्याचा क्ले मॉर्डल करून त्यास मान्यता घेण्यात आली. तदनंतर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन यांचे कडून चबुतरा व आराखड्यास मान्यता घेण्यात आली. पोलिस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार, पोलिस आयुक्तालय यांचे कडील नाहरकत पत्र व वाहतूक शाखा, स्थानिक पोलिस ठाणे यांचे कडून नाहरकत पत्र प्रापत करून घेऊन पुतळ्याचे पावित्र्य व संरक्षणाची जबाबदारी बाबतचे प्रमाणपत्र देऊन अंतिम प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे अध्यक्षतेखालील पुतळा समितीकडे पाठवून सदर समितीच्या शिफारसीनूसार मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.28/11/2022 रोजी परवानगी दिली. त्यानूसार प्रत्यक्ष पुतळा तयार करण्याच्या कामास शिल्पकाराकडून सुरूवात करण्यात आली.

तत्पुर्वी प्रत्यक्ष जागेवर श्री. छत्रपती शिवाजी महाराज या चौकात चौकाचे व चबुतऱ्याचे काम सुरू करण्यात येऊन चौकाचे व चबुतऱ्याचे काम करण्यात आले. सदर पुतळया सोबतच चबुतऱ्यावर राज्यभिषकांचे भिंती चित्र (म्युरल), श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे रायरेश्वर मंदिरातील शपथ विधीचे भिंती चित्र (म्युरल), 04 मावळे उभारणे इ. कामे शिल्पकाराकडुन सुरु आहेत. सदर कामाचे स्ट्रक्चर ऑडीट करण्याचे काम देखिल सुरु आहे. सदर काम पुर्ण न झाल्याने मा.मुख्यमंत्री महोदय यांची अनावरणासाठी वेळ मागण्यात आलेली नाही. सदर पुतळा व त्या अनुशंगिक चबुतरा, उद्यान इ. कामे पुर्ण झाल्यानंतर अनावरण कार्यक्रमाकरीता मा. मुख्यमंत्री महोदय यांची वेळ मागविण्यात येईल. सबब मा. मुख्यमंत्री महोदय यांची वेळ न मिळाल्यामुळे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आलेले नाही ही काही वृत्तपत्रांमध्ये छापून आलेली बातमी वस्तुस्थितीला धरून नाही.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2024-25/DK/AD-6

Scanned with OKEN Scanner